पीकपाणी

# हरभरा पिकाचे विविध वाण तसेच त्यांची वैशिष्ट्ये



**डॉ. अरविंद तोत्रे**
(मो.नं. ७७०९०२०१०१)
**डॉ. नंदकुमार कुटे**
**डॉ. सुदर्शन लटके**
कडधान्य सुधार प्रकल्प,
महात्मा फुले कृषी विद्यापीठ,
राहुरी, जि. अहमदनगर





महाराष्ट्र राज्याचे कडधान्यांचे क्षेत्र ४९.९४ लक्ष हेक्टर असून, उत्पादन ४९.८१ लक्ष टन व उत्पादकता ९९७ किलो प्रतिहेक्टर (२०२२-२३) एवढी आहे. या दरम्यान राज्यात हरभरा पिकाखालील क्षेत्र २९.५६. लक्ष हेक्टर असून, उत्पादन ३५.०९ लक्ष टन व उत्पादकता ११८७ किलो प्रतिहेक्टर एवढी आहे. हरभरा आंतरपीक व फेरपालटीच्या पिकांकरिता उत्कृष्ट आहे. हरभरा पिकाचे विविध वाण लागवडीसाठी उपलब्ध आहेत. रब्बी हंगामातील विविध वाण व वैशिष्ट्ये या लेखात दिली आहेत.

हरभरा हे रब्बी हंगामातील महत्त्वाचे पीक आहे. हे पीक डाळवर्गीय असल्यामुळे या पिकाच्या मुळांवरील ग्रंथीतील रायझोबियम जिवाणूमार्फत हवेतील साधारणपणे १३५ किलो नत्र/ हेक्टरी याप्रमाणे स्थिरीकरण होते. त्यामुळे जमिनीचा पोत टिकून राहण्यास मदत होते तसेच जमिनीची सुपीकता वाढते. महाराष्ट्र राज्याचे कडधान्यांचे क्षेत्र ४९.९४ लक्ष हेक्टर असून, उत्पादन ४९.८१ लक्ष टन व उत्पादकता ९९७ किलो प्रतिहेक्टर (२०२२-२३) एवढी आहे. या दरम्यान राज्यात हरभरा पिकाखालील क्षेत्र २९.५६. लक्ष हेक्टर असून, उत्पादन ३५.०९ लक्ष टन व उत्पादकता ११८७ किलो प्रतिहेक्टर एवढी आहे. हरभरा आंतरपीक व फेरपालटीच्या पिकांकरिता उत्कृष्ट आहे. हरभरा पिकाचे विविध वाण लागवडीसाठी उपलब्ध आहेत. रब्बी हंगामातील विविध वाण व वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-



* **विजय** (प्रसारण वर्ष १९९३)

**कालावधी** : जिरायत ८५-९० दिवस, बागायत १०५-११० दिवस.

अधिक उत्पादन क्षमता, मर रोगास प्रतिकारक्षम, पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता, जिरायत, बागायत भागास आणि उशिरा पेरणीस योग्य, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरात या तीन राज्यांसाठी प्रसारित.

**उत्पादन (क्विंटल/ हे.)** : जिरायती : प्रायोगिक उत्पादन : १४-१५, सरासरी उत्पादन : १४.००. बागायती : प्रायोगिक उत्पादन: ३५-४०, सरासरी उत्पादन: २३.००.

**उशिरा पेरणी** : प्रायोगिक उत्पादन: १६-१८, सरासरी उत्पादन: १६.००.

* **विशाल** (प्रसारण वर्ष १९९५)

**कालावधी** : बागायत ११०-११५ दिवस.

आकर्षक पिवळसर टपोरे दाणे, १०० दाण्यांचे वजन २८ ग्रॅम, मर रोगास प्रतिकारक्षम, प्रथिनांचे प्रमाण अधिक, घाटे आकाराने मोठे असून गर्द हिरवे असतात, प. महाराष्ट्राकरिता प्रसारित.

**उत्पादन (क्विंटल/ हे.)** : जिरायती : प्रायोगिक उत्पादन : १४-१५, सरासरी उत्पादन : १३, बागायती : प्रायोगिक उत्पादन : ३०-३५, सरासरी उत्पादन: २०.

* **दिग्विजय** (प्रसारण वर्ष २००६)

**कालावधी** : बागायत ११०-११५ दिवस.

पिवळसर तांबूस टपोरे दाणे, १०० दाण्यांचे वजन २४ ग्रॅम, मर रोगास प्रतिकारक्षम, जिरायत- बागायत तसेच उशिरा पेरणीस योग्य, घाटे आकाराने मोठे असून गर्द हिरवे असतात, संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता प्रसारित.

**उत्पादन** (क्विंटल/ हे.) : जिरायती : प्रायोगिक उत्पादन : १४-१५, सरासरी उत्पादन: १४. बागायती : प्रायोगिक उत्पादन: ३५-४०, सरासरी उत्पादन: २३.

**उशिरा पेरणी** : प्रायोगिक उत्पादन: २०-२२, सरासरी उत्पादन: २१.

* **फुले विक्रम** (प्रसारण वर्ष २०१९)

**कालावधी** : १०५-११० दिवस.

घाटे जमिनीपासून १ फुटाच्या वरती लागतात, वाढीचा कल उंच असल्यामुळे यांत्रिक पद्धतीने काढणी करण्यास उपयुक्त, पीक लोळत नाही, मर रोगास प्रतिकारक्षम, अधिक उत्पादन क्षमता, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, द. राजस्थानसाठी प्रसारित.

**उत्पादन** (क्विंटल/ हे.) : जिरायत प्रायोगिक : १६-१८, सरासरी उत्पादन: १६. बागायत प्रायोगिक : ४०-

४२, सरासरी उत्पादन: २२.

उशिरा पेर प्रायोगिक : २२-२४, सरासरी उत्पादन : २१.

*** फुले विक्रांत** (प्रसारण वर्ष २०१७)

पक्वता कालावधी : १०५-११० दिवस.

पिवळसर तांबूस मध्यम आकाराचे दाणे, १०० दाण्यांचे वजन १९.९ ग्रॅम, बागायती पेरणीसाठी योग्य. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, द. राजस्थान राज्यांसाठी प्रसारित.

**उत्पादन** (क्विंटल/ हे.) : या वाणाची उत्पादन क्षमता ४१.६६ क्विंटल/ हे. असून सरासरी उत्पादन २० क्विंटल/ हे. मिळते.



*** फुले विश्वराज** (प्रसारण वर्ष २०२१)

पक्वता कालावधी : ९५-१०५ दिवस.

पिवळसर तांबूस रंगाचा, मध्यम दाण्याचा असून, १०० दाण्यांचे वजन २२.०० ग्रॅम आहे, जिरायत पेरणीसाठी योग्य, मर रोग प्रतिकारक्षम, प. महाराष्ट्रासाठी प्रसारित.

**उत्पादन** (क्विंटल/ हे.) : जिरायत प्रायोगिक उत्पादन : २८-२९, सरासरी उत्पादन: १५-१६.

*** जाकी-९२१८** (प्रसारण वर्ष २००५)

विदर्भ विभागासाठी प्रसारित, मर रोग प्रतिकारक्षम, १०० दाण्यांचे वजन २२-२६ ग्रॅम.

**उत्पादन** (क्विंटल/ हे.) : जिरायत उत्पादन : १५-१६, बागायती उत्पादन: २६-२८.

*** पी.डी.के.व्ही. कांचन** (प्रसारण वर्ष २०१७)

पक्वता कालावधी : १०५-११०.

मर रोग प्रतिकारक्षम, टपोरे दाणे, विदर्भ विभागासाठी प्रसारित.

**उत्पादन** (क्विंटल/ हे.) बागायत प्रायोगिक उत्पादन : ३५-४२, सरासरी उत्पादन : १८-२०.

*** पी.डी.के.व्ही. कनक** (प्रसारण वर्ष २०१९)

पक्वता कालावधी : १०८-११०.

यांत्रिक पद्धतीने काढणीकरता योग्य, संरक्षित ओलिताखाली लागवडीसाठी शिफारस.

हा वाण महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातसाठी प्रसारित.

उत्पादन (क्विंटल/ हे.) सरासरी उत्पादन : १८-२० .

*** बी.डी.एन.जी.-७९७ (आकाश)** (प्रसारण वर्ष २००४)

मराठवाडा विभागासाठी प्रसारित.

मर रोग प्रतिकारक्षम, मध्यम आकाराचे दाणे, १०० दाण्यांचे वजन १८-२० ग्रॅम.

मर रोगास प्रतिकारक्षम, अवर्षण प्रतिकारक्षम.

उत्पादन (क्विंटल/ हे.): जिरायत उत्पादन : १४-१५, बागायती उत्पादन : २०-२२.

*** जवाहर ग्रॅम-२४ जे.जी.-२०१६-२४** (प्रसारण वर्ष २०२०)

पक्वता कालावधी : ११०-११५.

मर रोग प्रतिकारक्षम, यांत्रिक पद्धतीने काढणी करण्यास उपयुक्त वाण, १०० दाण्याचे वजन २९.३ ग्रॅम. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरात राज्यासाठी प्रसारित.

*** आर.व्ही.जी. - २०२** (राजविजय २०२) (प्रसारण वर्ष २०१२)

पक्वता कालावधी : १०५-११०.

उशिरा पेरणीकरिता योग्य, मर रोग प्रतिकारक्षम, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरात राज्यांसाठी प्रसारित.

*** आर.व्ही.जी.- २०४** (राजविजय २०४) (प्रसारण वर्ष २०२१)

पक्वता कालावधी : १०८-१११.

यांत्रिक पद्धतीने काढणी करण्यास उपयुक्त, मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम, १०० दाण्याचे वजन २३.४ ग्रॅम.

महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरात राज्यांसाठी प्रसारित.

* **पुसा मानव (पुसा ग्राम-२०२११)** (प्रसारण वर्ष २०२१)

पक्वता कालावधी : १०८-११०.

निमपसरट वाण, १०० दाण्यांचे वजन १९.५ ग्रॅम, मर रोगास अधिक प्रतिकारक्षम, कोरडी मूळकुज, मानकूज व खुजा रोग प्रतिकारक्षम.

**काबुली वाण**

* **विराट** (प्रसारण वर्ष २००१)

पक्वता कालावधी : ११०-११५.

अधिक टपोरे दाणे, मर रोग प्रतिकारक्षम. १०० दाण्यांचे वजन ३५ ग्रॅम. महाराष्ट्र राज्यासाठी प्रसारित.

**उत्पादन** (क्विंटल/ हे.): जिरायत प्रायोगिक उत्पादन : १०-१२, सरासरी उत्पादन : ११ बागायती प्रायोगिक उत्पादन : ३०-३२, सरासरी उत्पादन: १८

* **कृपा** (प्रसारण वर्ष २००९)

पक्वता कालावधी : १०५-११०.

जास्त टपोरे दाणे असणारा काबुली वाण, १०० दाण्यांचे वजन ५९.४ ग्रॅम, मर रोग प्रतिकारक्षम, सफेद पांढरे दाणे, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि कर्नाटक राज्यांसाठी प्रसारित.



उत्पादन (क्विंटल/ हे.): सरासरी उत्पादन-१६-१८, प्रायोगिक उत्पादन : ३०-३२.

* **काक-२, पी.के.व्ही.-२** (प्रसारण वर्ष २०००)

पक्वता कालावधी : १००-१०५.

अधिक टपोरे दाणे, मर रोग प्रतिकारक्षम, १०० दाण्यांचे वजन ३७-४० ग्रॅम.

उत्पादन (क्विंटल/ हे.): २६-२८.

* **पी.के.व्ही.-४** (प्रसारण वर्ष २००८)

पक्वता कालावधी : १००-११०.

अधिक टपोरे दाणे, मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम. १०० दाण्यांचे वजन ५०-५३ ग्रॅम. विदर्भाकरिता प्रसारित.

उत्पादन (क्विंटल/ हे.): १६-१८.

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता **मोबाईल नंबर**सह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला **पासपोर्ट आकाराचा फोटो**ही जरूर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**